**तक्ता -"अ"**

## - : जाहीर नोटीस :-

### अर्थ व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय,सोलापूर,

जा.क्र./४०८२/२०२५, दि.१४/११/२०२५.

जिल्हा न्यायालय, सोलापूर येथील **05** नादुरुस्त लॅन स्वीचची तपासणी करुन अहवालासह त्या दुरुस्ती करणेकामी अधिकृत विक्रेते व सेवा पुरवठादार यांच्यामार्फत दरपत्रके मागविण्यात येत आहेत. विवरण पुढीलप्रमाणे..

| Sr. No. | LAN Switch Location | Make & Mode | Sr.No. |
|---|---|---|---|
| 1. | Dist.Court, V.C. Room, Solapur | Cisco/Catalyst 2960-X (24 Port) | FCW2037A389 |
| 2. | C.J. Senior Divison, Solapur | Cisco/Catalyst 2960-X (24 Port) | FCW2037A39P |
| 3. | Chief Judicial Magistrate, Solapur | Cisco/Catalyst 2960-X (24 Port) | FCW2037A3L7 |
| 4. | Nazir office, D.C. , Solapur | Cisco/Catalyst 2960-X (8 Port) | F0C2035Y0ZR |
| 5. | CJSD, Computer Section , Solapur | Cisco/Catalyst 2960-X (24 Port) | FCW2037A3LV |

## नियम व अटी

१. जिल्हा न्यायालय, सोलापूर येथील तक्त्यातील नमूद नादुरुस्त **"LAN Switch"** यांची दुरुस्तीसाठी ही जाहीर निविदा सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून (7) सात दिवसांच्या आत म्हणजेच दि. **21 / 11 /2025** रोजी दु. 4.00 वाजेपर्यंत, इच्छुक पुरवठादारांनी **"जिल्हा न्यायालय, सोलापूर"** येथे प्रत्यक्ष भेट देवून उपकरणांची तपासणी करुन, संबंधीत तपासणी अहवालासह दरपत्रक सादर करावे. सदर अहवाल **"प्रबंधक कार्यालय"** येथे **मा. अध्यक्ष, जिल्हा संगणक समिती, जिल्हा न्यायालय, सोलापूर** यांच्या नावाने बंद लखोट्यात सादर करावा.

२. सदर बंद लखोट्यावर "***QUOTATION FOR 'LAN SWITCH' REPAIRS***" असे नमुद करावे.

३. तपासणीसाठी कोणतेही शुल्क अदा केले जाणार नाही. निविदा सादर करणे, दुरुस्तीकरीता लागणारे साहित्य व त्याची वाहतूक इ. बाबी स्वखर्चाने करावे लागेल. सदर बाबतचा खर्च अनुज्ञेय होणार नाही.

४. दरपत्रकांमध्ये तपासणी अहवालसह आवश्यक दुरुस्तीसाठी लागणा-या वस्तूंचे दर हे (मजुरी) सेवाखर्चासह सादर करावेत.

५. निविदा सादर करताना, दरपत्रकावर **GST/SGST क्रमांक** असणे आवश्यक आहे. जर GST/SGST क्रमांक लागू नसेल, तर संबंधित प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक नमूद असलेले निविदाकाराचे **लेटरहेडवरील दरपत्रक** ग्राह्य धरले जाईल.

६. दरपत्रक भरतांना सर्व करांसह दरपत्रक भरावे. मात्र GST टॅक्स असल्यास त्याचा स्वतंत्र दर नमुद करावा. त्याचवेळी महाराष्ट्र शासनास पुरवठा केल्यास तरतुदीप्रमाणे सुट दिली जाते त्या अटीस आधीन राहून दरपत्रक द्यावे लागेल तसेच बिलाची रक्कम अदा करतांना नियमानुसार TDS कपात करण्यात येईल.

७. उपकरणांची तपासणी ही कार्यालयीन वेळेतच (सकाळी १०.३० ते सायं.५.००) करावी लागेल. तपासणी सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयात उपस्थित राहूनच करावयाची आहे.

८. प्राप्त झालेल्या तपासणी अहवाल व दरपत्रके **स्वीकारणे किंवा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. अध्यक्ष, जिल्हा संगणक समिती, जिल्हा न्यायालय, सोलापूर** यांच्याकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

DISTRICT COURT OF SOLAPUR सत्यमेव जयते डिस्ट्रिक्ट कोर्ट सोलापूर

आदेशावरुन,

क.लिपीक

सहा.अधिक्षक

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, सोलापूर.